Vol 2 Issue 7 April 2013

ISSN No : 2249-894X

*Monthly Multidisciplinary Research Journal*

# *Review Of Research Journal*

Chief Editors

**Ashok Yakkaldevi**
**A R Burla College, India**

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

## Welcome to Review Of Research

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2249-894X**

Review Of Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial Board readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## *Advisory Board*

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Fabricio Moraes de AlmeidaFederal
University of Rondonia, Brazil

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Xiaohua Yang
University of San Francisco, San Francisco

Karina Xavier
Massachusetts Institute of Technology (MIT), USA

May Hongmei Gao
Kennesaw State University, USA

Marc Fetscherin
Rollins College, USA

Liu Chen
Beijing Foreign Studies University, China

Mabel Miao
Center for China and Globalization, China

Ruth Wolf
University Walla, Israel

Jie Hao
University of Sydney, Australia

Pei-Shan Kao Andrea
University of Essex, United Kingdom

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Ilie Pintea
Spiru Haret University, Romania

Mahdi Moharrampour
Islamic Azad University buinzahra Branch, Qazvin, Iran

Titus Pop
PhD, Partium Christian University, Oradea,
Romania

J. K. VIJAYAKUMAR
King Abdullah University of Science & Technology,Saudi Arabia.

George - Calin SERITAN
Postdoctoral Researcher
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences
Al. I. Cuza University, Iasi

REZA KAFIPOUR
Shiraz University of Medical Sciences
Shiraz, Iran

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

Nimita Khanna
Director, Isara Institute of Management, New Delhi

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University, Kolhapur

P. Malyadri
Government Degree College, Tandur, A.P.

S. D. Sindkhedkar
PSGVP Mandal's Arts, Science and Commerce College, Shahada [ M.S. ]

Anurag Misra
DBS College, Kanpur

C. D. Balaji
Panimalar Engineering College, Chennai

Bhavana vivek patole
PhD, Elphinstone college mumbai-32

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary, Play India Play (Trust),Meerut (U.P.)

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Sonal Singh
Vikram University, Ujjain

Jayashree Patil-Dake
MBA Department of Badruka College Commerce and Arts Post Graduate Centre (BCCAPGC),Kachiguda, Hyderabad

Maj. Dr. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

AR. SARAVANAKUMARALAGAPPA
UNIVERSITY, KARAIKUDI,TN

V.MAHALAKSHMI
Dean, Panimalar Engineering College

S.KANNAN
Ph.D , Annamalai University

Kanwar Dinesh Singh
Dept.English, Government Postgraduate College , solan

More.........

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.ror.isrj.net**

*Review Of Research*
Vol. 2, Issue. 7, April. 2013
**ISSN:-2249-894X**
Available online at www.ror.isrj.net
ORIGINAL ARTICLE

# *मराठी साहित्यातील विनोदाचे स्वरूप आणि वाटचाल : एक चिंतन*

*संजय संभाजी लांडगे*

सहयोगी प्राध्यापक, अे.आर. बुर्ला कॉलेज, सोलापूर.

## *विनोद म्हणजे काय? :-*

विनोद ही मानवाला मिळालेली दैवी देणगी आहे. हास्य ही मानवाची सहजसाध्य नैसर्गिक प्रवृत्ती आहे. विनोद हा एक प्रगल्भवृत्तीची जाणीव देणारा जीवनधर्म आहे. आणि मानवी संस्कृतीच्या अभिजाततेने जपलेला तो एक अमोल वारसा आहे. विनोद ही प्रामुख्याने भाषेच्या माध्यमातून आणि प्राथमिक पातळीवर हावभावांच्याद्वारे प्रतीत होणारी एक अत्यंत महत्वाची अशी बौद्धिक व मानसिक प्रक्रिया आहे. आणि त्याची परिणती मानवाच्या हास्यात होत असल्यामुळे त्याचा आस्वाद प्रक्रियेत मनाबरोबरच शारीरिकतेचाही अंश आहे. अशा प्रकारे चातुर्विध कार्याशी विनोदाचा संबंध असल्याने त्याचे स्वरूप अनेकविध आहे.

ग्रीकांच्या पुराणकथामधून विनोदाच्या स्वरूपाचे मोठे मार्मिक दिग्दर्शन करण्यात आले आहे. त्यांच्या नऊ वाग्देवतामध्ये विनोदाची अधिष्ठात्री देवता 'थालिया' ही आहे. शोकनाट्य, काव्य इत्यादिकांवर अधिराज्य गाजविणाऱ्या तिच्या मोठ्या बहिणीपेक्षा ती अनेक बाबतीत वेगळी आहे. 'थालिया' ही बघता बघता इतकी निरनिराळी रूपे धारण करते की तिचे खरे स्वरूप ओळखणे कित्येकदा तिच्या बहिणींनाही कठीण होऊ बसते. मुक्तविहार स्वच्छंदीपणा हा तिचा गुण आहे. ग्राम्यता, बावळटपणा, विसंगती टिंगल टवाळीदृष्टीने पाहता त्यांना आपल्या खळाळणाऱ्या हास्याने हास्यास्पद करून सोडते. हास्यविनोद हे तिचे प्रभावी शास्त्र आहे. खेळकरपणा, स्वैरस्वच्छंदता, कल्पना चत्मकृती, उपहास, उपरोध, तिचे गुण विनोद निर्माण करण्यास पूरक आहेत. माणसाच्या अहंकारी कर्तृत्वसंपन्न हालचालीमागे दडलेल्या माणसाच्या दुबळेपणाचे प्रत्यंतर देऊन त्याला जीवनसन्मुख करण्याची तिचि किमया हे तर तिचे सामर्थ्य आहे.

एकंदरीत विलक्षणशिलता, बहुविधता, मनुष्यसंबंधता, लवचिकता, सहजता, क्रिडामयता, चिंतनशिलता ही विनोदाच्या अंगापैकी काही महत्वाची अंगे आहेत. ऑरिस्टॉटलने आपल्या काव्यशास्त्रात दुःख कल्पनेशी निगडीत अशा शोकनाट्याची जितक्या गांभिर्याने चर्चा केली. तितकी विनोदाशी संबंधित असलेल्या सुखनाट्याची केली नाही. नाट्यचर्चेच्या अनुषंगाने भरतमुनीनी रसविचार प्रसूत केला. त्यामध्ये त्यांनी हास्यरसाविषयी जे विचार मांडले त्याच्याच अवतीभोवती हास्यचर्चा घोटाळत राहिली. आणि त्यामधून बाहेर पडून मौलिक स्वरूपाचे विचार मंथन संस्कृत साहित्य शास्त्राला करता आले नाही. कर्मकांडामुळे जातीभेदाच्या तीव्रतेमुळे आणि विशेषतः आध्यात्माच्या व वेदांत विचाराच्या अतिरेकाने आपल्याकडे विनोदाची सातत्याने गळचेपीच होत राहिली. त्यामुळे 'हास्य-विनोदा'च्या स्वरूपाचे सखोल आकलन वा चिंतन आपल्याकडे होऊ शकले नाही.

संस्कृतामध्ये विनोद हा शब्द वि+नुद् या धातूपासून तयार झालेले भाववाचक नाम आहे. मनाची काळजी घालवून आनंद, उत्साह याची निर्मिती करणारा हा त्याचा आणखी एक अर्थ महत्वाचा आणि मौलिक स्वरूपाचा आहे. विनोद हा वरील दोन्ही अर्थाचे महत्वाचे कार्य करतो. याची जाणीव प्राचीन भारतात होती हे यावरून लक्षात येते.[१] 'एन्सायक्लोपिडिया ब्रिटानिका'च्या आधारे ह्यूमर (Humour) हा जो विनोदाचा इंग्रजी प्रतिशब्द, त्याच्या मुळ अर्थात फरक होत होत त्याला आजचा अर्थ प्राप्त झालेला आहे. त्या मूळ शब्दाचा मुळ अर्थ 'ओलावा' असा आहे. मराठीतील 'विनोद' शब्दामध्ये तर 'ह्यूमर' शब्दाइतकीही अर्थांतरे झालेली नाहीत. विनोद शब्दाचा मुळ अर्थ दूर सारणे असा आहे. मनाला आलेला जो क्षण तो दूर सारण्यास ज्याचा उपयोग होतो. तो विनोद हाच त्याचा स्वाभाविक अर्थ आहे.[२] अनेक विद्वान पंडीत अभ्यासकांनी विनोदाविषयी वेगवेगळी मते मांडली आहेत. प्लेटो, बर्गसाँ तर व्हि.के. कृष्णमेनन, मॅक्स ईस्टमन, बेकन, डॉ. जोबर्ट, प्रेंगरी, फ्राईड न.चि. केळकर, पु.ल. देशपांडे, प्र.के. अत्रे, चि.वि. जोशी, श्रीपाद कृष्ण कोल्हटकर गंगाधर गाडगीळ अशा कितीतरी अभ्यासक विचारवंतांनी विनोदाची मिमांसा शारीरिक व मानसिक अशा दोन्ही अंगाने केलेली दिसून येते.

## *मराठी विनोदाची पार्श्वभूमी :-*

मराठी भाषेतील विनोदी गद्य वाङ्मयाला खरी सुरूवात इ.स. १९०२ मध्ये झाली. ती श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांनी केली. परंतु त्यापूर्वीच्या

काळातील संत साहित्य, पंडिती साहित्य, शाहिरी वाङ्मय यांच्याकडूनही विनोदाची निर्मिती झाली आहे. परंतु ती फारच तुटपुंजी होती. मराठी संतकवींनी सगुणभक्तीचा स्वीकार करून अनेक देवदेवतांचे लिलावर्णन केले आहे. देवांना मानवी पातळीवर आणून त्यांची सुरस चरित्रवर्णने केली. या चरित्रातून हास्यरसाला काहीसा वाव मिळाला आहे. कूटरचना इत्यादी रचनात्मककृतीचे प्रकार आणि श्लेष वक्रोवृत्ती संस्कृतकडून उचलून ती मराठीत आलेली दिसून येते. परंतु संस्कृतप्रमाणे नाटके, प्रहसने, चंपू, भाण इत्यादी हास्यरसाला अधिक मोकळेपणाने वावरू देणारे साहित्य प्रकार मात्र निर्माण झाले नाहीत.

महानुभाव पंथाचे श्री. चक्रधरस्वामी यांच्या उमद्या आणि खेळकर स्वभावामुळे लिळाचरित्रातील  तुरळक सापडणाऱ्या विनोदाला एक प्रकारचे आगळे वैशिष्ट्ये प्राप्त झालेले दिसते. तसेच गोविंदप्रभू चरित्रात गोविंदप्रभूचे अनेक वेडाचार सापडतात. या वागण्यामुळे गोविंदप्रभू स्वतःच अनेकवेळा हास्यास्पद ठरतात. त्यांचे वर्तन, वेष, वागणे सर्वच विपरीत आणि हास्यास्पद ठरते. विव्हाओ क्रिडा, धीरडे खाण्याची इच्छा होणे, वांगे आणि कांदा यांना तेलाची फोडणी दिल्यास त्याची गोडी अमृताहून अधिक होईल. हा कांद्या-वाग्यांच्या भरिताचा विनोद असे सांगितले जाते.[३] तसेच 'शिशूपालवध' या ग्रंथात स्वभावनिष्ठ व प्रसंगनिष्ठ विनोदाचा ज्यात उत्कृष्टपणे मिलाफ झालेला आढळतो. 'उद्धवनारद विनोद' या प्रसंगात नारदाच्या तोंडावर उद्धवाने केलेला त्याच्या कळीलावीपणाचा उल्लेख नारदाने उमेदपणाने थट्टा झेलून उद्धवाला दिलेले उत्तर यातून खुशखुशीत विनोदाचा मासला पहावयास मिळतो. श्रीकृष्ण रुक्मिणी प्रीती कलहाचा प्रसंग भास्करभट्ट बोरीकरांनी चांगलाच रंगवला आहे. त्यामध्ये शृंगार आणि हास्य या दोन्ही रसांचा उत्कट प्रत्यय आणून देणारा हा प्रसंग आहे. 'ज्ञानेश्वरीतील विनोद' शंकर पार्वती संवादातून पतीकडून झालेली स्त्री सौंदर्याची स्तुती स्त्रियांना किती प्रिय असते. हे दर्शवून ज्ञानेश्वरांनी स्त्री स्वभावातील एका नाजूक मर्माची तितक्याच हळूवारपणे उकल केलेली दिसते. एकनाथांच्या विनोदाची जाण दोन भिन्न अभिरूचीचे समराधन करणारी दिसते. एकनाथी भागवत, रुक्मिणी स्वयंवर, भावार्थ रामायण यातील विनोद सुसंस्कृत, उच्च अभिरूचीचा वाचकांना आवडेल असा आहे. विविध विषयावर उपरोधिक अर्थाने लिहिलेली भारूडे म्हणजे हास्याचा खजिना आहे. रंजन करता करता प्रबोधन करणे हा भारूडांचा प्रमुख हेतू आहे. नक्कल, महारीण, जागल्या, हुंडगी, आंधळा, बहिरा, कोल्हाटीन, फुगडी, बायला, दादला, अशी कतीतरी भारूडे आजही लोकप्रिय आहेत. 'विंचू वाचला' हे भारूड ऐकताना विंचू चावल्याचा बहाणा कराणारा भारूडी थयथय नाचतो. वेदनेने व्याकुळ झाल्याचा अभिनय करतो. ही त्याची कृती इतकी अतिरंजित असते की, पहाणारे खदाखदा हसू लागतात. आणि अखेरीस विंचू चावल्याचा उलगडा झाला की, अंर्तःमुख होतात. विनोदाची आत्मबोधाशी सांगड घालून त्यांनी अवखळ विनोदात आपल्या भारूडातून मनुष्यस्वभावातील सारी विसंगतीच नाट्यपूर्णतेने अविष्कृत केली आहे. अक्षरशः या भारूडातून नाथांनी विनोदाचा पाऊसच पाडला आहे.

संत तुकाराम आणि समर्थ रामदास यांच्या साहित्यातूनही विनोद उपहास, उपरोध घेऊन अवतरला आहे. कर्कश बायको, अवा निघाली पंढरपूरा, व्यभिचारी स्त्री, बायकोच्या अधिन झालेला नवरा, भोळे, मतिमंद, नकली कवी, भोंदू साधू इत्यादी लोकांना तुकारामांनी आपल्या टिकेचे लक्ष केले. त्यांचा त्यांनी केलेला उपहास म्हणजे विनोदाचा खास नमुनाच म्हणावे लागेल.[४] संत रामदासाचा दासबोधातील विनोद पाहण्यासारखा आहे. पंडीतकवींनी लिहिलेल्या स्त्री गीतातून, स्वयंवर काव्यातून विनोदाची भर घातली आहे. रघुनाथपंडीत, वामनपंडीत, विठ्ठल बीडकर, नागेश सामराज, श्रीधर, महिपती, अमृतराय, मोरोपंत अशा कितीतरी पंडीत कवींनी आपल्या उत्कट कलाकृतींच्याद्वारे विनोदाची निर्मिती साधली आहे. शाहिरांनी आपल्या कवनांमध्ये रंजना बरोबरच विनोदनिर्मिती साधावी, शृंगाराबरोबरच विनोद निर्मिती केली. त्यांनी अतिशोक्ती, शृंगार आणि शब्द चत्मकृती ही हास्यनिर्मितीची ठराविक तीन साधने पुन्हा पुन्हा उपयोगात आणली. पुढे इंग्रजी साहित्याच्या संपर्कात आल्यावर आपल्या काही शिकलेल्या तरुणांनी इंग्रजी साहित्याच्या प्रभावाखाली येऊन वाङ्मय निर्मिती केली. त्या वाङ्मयामधूनही विनोदाची निखळ निर्मिती साधली गेली.

### *निखळ मराठी विनोदाची निर्मिती :-*

मराठीतील स्वतंत्र विनोदाची सुरुवात श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांपासून झालेली दिसून येते. कोल्हटकरांनी स्वतंत्र विनोदी लेखनास सुरुवात करण्यापूर्वी त्यांच्या टिका लेखातून आणि त्यांनी लिहिलेल्या नाटकातून त्यांच्या विनोदलेखन शक्तीची चुणूक दिसून आली होती. कोल्हटकरांच्या नाटकातील विनोदीपात्रे व इतरही पात्रे त्यांच्या मुखाद्वारे उधळणाऱ्या कोट्या त्यामुळे त्यांच्या नाटकांचा वेगळेपणा लक्षात येत होता. मात्र त्यांची विनोदी पात्रे इथून तिथून भित्री, मूर्ख, नादान, दूष्ट आणि विद्रूप आहेत. या विनोदी पात्रातील बहुतेक पात्रे खलपुरुष किंवा त्यांचे सहकारी असल्यामुळे ती चांगली दाखविल्यास त्यांचा गौरव होईल या कल्पनेने कोल्हटकर त्यांना हास्यास्पद बनवतात असे दिसते. इ.स. १९०२ साली त्यांनी लिहिलेल्या विक्रम शशिकले वरील टिकेत उपहासाचे शस्त्र त्यांनी मांडले की, तो लेख चांगलाच गाजला. त्यानंतर सुदामा, बडूनाना, पांडूतात्या तसेच सुदाम्याचे पोहे, साहित्यबत्तीशी हे विडंबनात्मक लेख लिहून स्वतःचे एक वेगळे स्थान निर्माण केले. शिमगा व श्रावणी हे दोन धार्मिक विडंबनात्मक लेखन करून सामाजिक प्रबोधन करतातच विनोदातून लोकांचे मन परावर्तीत करण्याचा त्यांचा प्रयत्न महत्वाचा वाटतो. 'चोरांचे संमेलन', 'साहित्य परिषदेची तयारी' हे लेख उत्तम विडंबन लेख म्हणून नजरेत भरतात. कोल्हटकरांनी मराठीतील 'विनोद' या शब्दाला अधिक व्यापक अर्थ दिला आणि मराठी विनोदाचे जनक हे बिरूद मिरवित ते मराठी वाङमयात अमर होवून राहिले.

यानंतर राम गणेश गडकऱ्यांनी आपल्या वेगळ्या आगळ्या शैलीने व कल्पक प्रतिभेने मराठी विनोद हास्याचे क्षितिज उजळून टाकले. 'छोट्या जगूचा रिपोर्ट' म्हणून अवघा पंचवीस ओळीचा लेख जो विनोदी लेख गडकऱ्यांनी लिहिला. तो इतका सुंदर आहे की, त्याची जेवढी प्रशंसा करावी तेवढी थोडी आहे. गडकऱ्यांचा म्हणून जो काही विनोद प्रसिद्ध आहे तो प्रामुख्याने एकीकडे नाट्यलेखन चालू असता 'बाळकराम' या टोपणनावाने मासिक 'मनोरंजनात' लिहिलेल्या रिकामपणाची कामगिरी या अपूर्ण लेखमालेतून 'वर संशोधन' लग्नाच्या मोहिमेची पूर्ण तयारी, लग्न मोडण्याची कारणे तसेच स्वयंपाक घरातील गोष्टी, कवीचा कारखाना या लेखामुळे गडकरी खूपच गाजले. गडकऱ्यांच्या कल्पना शक्तीतून आणि लोकांना हसविण्याच्या प्रवृत्तीतूनच त्यांची लेखणी अधिक अधिक प्रगल्भ होत गेली आहे.[५] या लेखातून अतिशोक्तीने रंगविलेले हास्यस्फोटक प्रसंग वाचकांच्या नजरेसमोर येत राहतात. गडकऱ्यांचा विनोद हा अत्यंत निखळ निरागस आणि सच्चा आहे. विडंबन, उपहास, खोचक उपरोधिक कोट्या कोणत्याही पद्धतीचा प्रसंग असो. गडकरी तेथे सहजपणे हसवून जातात. उत्तम भाषाप्रभूत्व आणि विनोदवृत्ती यांचा मिलाफ त्यांच्या कलाकृतीत झालेला दिसून येतो. म्हणूनच विनोदाच्या बाबतीत राम गणेश गडकरी हे कोल्हटकरांचे खरे वारसदार वाटतात.

न.चि. केळकर, कॅ. लिमये आणि ना. धो. ताम्हणकर या तिन्हीही लेखकांनी पुढे विनोदाचा वारसा मोठ्या नेटाने पुढे आणला आपल्या अनेक कलाकृतीच्या माध्यमातून त्यांनी सहज सुंदर विनोद मराठी साहित्य आणि रंगभूमीवर आणला. त्यामुळे मराठी साहित्य विश्व विनोदाच्या परंपरेला विसरू शकत नाही. फार महत्वाची आणि मोलाची कामगिरी या तिन्ही लेखकांनी केली आहे. यानंतरच्या काळात चि.वि. जोशी यांचा उदय झाला. जोशी यांनी अनेक विनोदी कलाकृती लिहून मराठी साहित्य विश्वात आपले एक वेगळे स्थान निर्माण केले. चिमणचारा, सगळेच मुसळ केरात, मोरू आणि मैना, चिमणरावांचे चऱ्हाट, एरंडाचे गुऱ्हाळ, बोरी आणि बाभळी, घरबशे आणि पळपुटे असे कितीतरी ग्रंथ कितीतरी लेख आणि कितीतरी विनोदी स्त्री पुरुषपात्रे या विनोदी प्रवासगंगेत पावन झाली आहेत. त्यांचा विनोद हा उच्चदर्जाचा आणि अत्यंत निखळ स्वरूपाचा आहे. मार्मिकता, समतोल आणि संयम यांची यथार्थ जाण आणि संथ, संयत लेखनाची व्यासंगपूर्ण बैठक, समाजाच्या दैनंदिन स्थित्यंतराचे डोळस अवलोकन व वस्तुनिष्ठदृष्टीने त्यातले विसंगतीचे दर्शन घडविताना अंतरंगी तेवत ठेवलेली अतूट सहृदयता यामुळे केवळ विनोद म्हणूनच नव्हे तर मानसशास्त्रदृष्ट्या आणि समाजशास्त्रदृष्ट्याही त्यांचे लेखन अभ्यासनीय ठरले आहे. कोल्हटकर गडकरी यांच्या तुलनेने चि.वि. जोशीचा कल्पना विलास आणि बुद्धीविलास बराच सौम्य आहे. परंतु खांडेकरांनी म्हटल्याप्रमाणे त्यांच्या विनोद विषयात फार मोठी विविधता आणि व्यावहारिकता आहे.

### *प्र.के. अत्रे यांची कामगिरी :-*

प्र.के. अत्रे यांनी मराठी साहित्य विश्वामध्ये आपल्या साहित्याने एक महत्वपूर्ण कामगिरी केली आहे. त्यांच्या 'साष्टांग नमस्कार' या नाटकाने रसिक प्रेक्षकांना सतत तीन तास हसत ठेवण्याचा विक्रमी प्रयोग केला. 'झेंडूच्या फुलांनी' विडंबन काव्याला प्रतिष्ठा प्राप्त करून दिली. 'ब्रह्मचारी' या विनोदी बोलपटाने लोकप्रियतेचा उच्चांक गाठला. आणि त्यांच्या घणाघाती व्याख्यानांनी त्यांच्या हयातभर हशाटाळ्यांचा प्रचंड प्रतिसाद मिळविला. सर्व रसिक श्रोत्यांना जीवनातील सर्व अंगातील व्यंगांची आणि ढोंगाची ओळख करून दिली. उत्स्फूर्तता हा त्यांच्या विनोदाचा मोठाच गुण होय. कथा, काव्य, विडंबन काव्य, टिकात्मक लेख, कादंबरी, नाटक, चित्रपट कथा, वृत्तपत्रीय लेखन इत्यादी सारे वाङ्मय प्रकार त्यांनी उत्तम प्रकारे हाताळले आहेत. त्या काळात अत्रे म्हणजेच विनोद असे एक समीकरण बनून गेले होते. अत्रे यांनी विनोदाला अनेक अंगानी समृद्ध केले. त्यांनी प्रामुख्याने विनोदाच्या, विनोद विडंबन, उपहास, कोट्या या प्रकारावर भर दिलेला दिसतो. त्यांचा विनोद बहुरंगी, बहुढंगी होता. प्रदिर्घकाळापर्यंत हजारो लोकांना हास्यलहरीवर तरंगत ठेवण्याचे सामर्थ्य त्यांच्या विनोदात होते. त्यांचा विनोद झिरपणारा निर्झर नव्हता तर उसळ्या घेणारा धबधबा होता.[६] विडंबन, उपहास, कोट्या, राजकीय लेख चित्रपटातील विनोद या सर्वच स्तरातून अत्रे यांनी महाराष्ट्रातील माणसाला विनोद हास्यात बुडवून काढले. म्हणूनच आजही लोक त्यांना विनोदसम्राट म्हणूनच मानाचा मुजरा करतात.

### *विनोदवीर पु.ल. देशपांडे :-*

पु.ल. देशपांडे हे आणखी एक अभिरूची संपन्न आणि विकसनशील विनोदाचा वारसा लाभलेले मोठे व्यक्तिमत्व महाराष्ट्राला लाभले. विनोदाच्या क्षेत्रातील पु.ल.चे कर्तृत्व गद्य विडंबनकार आणि व्यक्तीचे व्यंगचित्रण करणारे म्हणून नजरेत भरते. शब्दनिष्ठ विनोदाला त्यांनी उच्च स्थानावर नेऊन ठेवले. त्यांनी अनेक गद्य विडंबने लिहून सादर केली आहेत. या खेरीज बटाट्याची चाळ, हसवणूक, असा मी असा मी, अपूर्वाई, पूर्वरंग असे अनेक ग्रंथ त्यांनी लिहिले आहेत या सगळ्याच साहित्यामधून उपहास विडंबन, कोट्या, घटना-प्रसंगांना नाट्यमय विनोदाची कलाटणी, शब्दनिष्ठ प्रसंगनिष्ठ व्यक्तिचित्रांच्या रूपातून व्यक्तिनिष्ठ स्वभावनिष्ठ विनोदी पेरणी त्यांनी केली आहे.[७] त्यामधून त्यांच्या निखळ विनोदाचे दर्शन घडते. त्यांची विडंबक प्रतिमा सर्वगामी आहे. त्यामुळे आमुक आमुक गोष्टींचे त्यांनी विडंबन केलेले आहे असे म्हणण्यापेक्षा त्यांनी विडंबन कशाचे केलेले नाही असे म्हणजेच अधिक संयुक्तिक ठरेल. गद्य विडंबने आणि व्यक्तिचित्रे ही पु.ल. विनोदाची लेणी आहेत. आजही महाराष्ट्रभर पु.ल. च्या विनोदाने आनंदाची पर्वणी जागृत होते. पु.ल. देशपांडे यांचे विनोदाच्या क्षेत्रातील कर्तृत्व हे महत्वपूर्ण आणि महाराष्ट्राची अभिरूची संपन्न करणारे आहे.

गंगाधर गाडगीळ, वि.आ. बुवा, रमेशमंत्री, बाळ गाडगीळ, बाळ सामंत, वसंत सबनीस, सुभाष भेंडे, बा.भ. पाटील, इंद्रायणी सावकार अशा कितीतरी लेखकांनी पुढे विनोदाची परंपरा चालविलेली आहे. कथा, कविता, कादंबरी, विनोदी लेख, व्यक्तीचित्रणे अशा विविध स्वरूपातून लेखन करून विनोदाची वाटचाल चालूच ठेवली आहे. प्रत्येक लेखकाची शैली वेगळी आहे. मांडणी आणि कल्पना सामर्थ्य यांचे बळ घेऊन उपहास, विडंबन, कोट्या करीत हा विनोद कधी आनंद लहरी निर्माण करीत तर कधी उसळ्या घेत पुढे वाटचाल करताना दिसून येतो.

### *१९६० नंतरची विनोदाची वाटचाल :-*

मराठी विनोदाच्या वाटचालीमध्ये १९६० नंतर उदयास आलेल्या ग्रामीण कथाकारांचा वाटाही महत्वाचा आहे. ग्रामीण कथांच्या क्षेत्रात विनोदाचा अखंड झरा निर्माण करणारे द.मा. मिरासदार, शंकर पाटील यांचा वाटा महत्वाचा आहे. यांनी ग्रामीण विनोदी कथांची बरसात केली. वि.आ. बुवा व बाळ गाडगीळ यांनी 'ग्रामीण स्टुरी'च्या नरमगरम फॉर्म्युल्याचे चांगलेच दर्शन घडविले आहे. ना. धो. महानोर यांनी आपल्या 'रानातल्या कविता' सग्रहाच्या परिशिष्टातील एकुलत्या एक कवितेमध्ये त्याची चांगलीच गंमत उडविली आहे. पुढे रामदास फुटाणे, फ.मु. शिंदे यांनी उपहासपर फटके, वात्रटिका शेरशायरीमधून विनोदाची बरसात केली आहे. वसंत कानेटकर छूमंतर, प्रेमाच्या गावा जावे, प्रेमा तुझा रंग कसा, विजय तेंडूलकर उपहास, विडंबनपर 'घाशीराम कोतवाल' विनोदी स्वरूपाची फार्सिकल नाटके रंगमंचावर कितीतरी आली रसिक श्रोत्यांची करमणूक करून गेली. परंतु नंतरच्या या काळामध्ये खास विनोदाची निर्मिती व्हावी म्हणून लेखन झालेले नाही. विनोदी विषयाच्या अंगाने स्वतंत्रपणे लिहिणारा लेखकही निर्माण झाला नाही. विनोदी एकपात्री प्रयोग होत राहिले. देवेंद्र प्रेम यांचे 'ऑल दि बेस्ट' व संतोष पवार, केदार शिंदे यांचे द्रौपदी वस्त्राहरण, इत्यादी सारखे लोकांचे रंजन करणारे नाटके येत राहिली. परंतु ती फार काळ टिकली नाहीत. आजच्या मराठी साहित्य विश्वामध्ये ग्रामीण, दलित, स्त्रीवादी, जनवादी,

आदीवासी भटक्यांचे साहित्य, मुस्लिम मराठी साहित्य असे अनेक प्रवाह तयार झाले. साहित्य जीवनवादाकडे वळले आहे. वास्तववाद, अतिवास्तववाद आणि मानवी जगण्यातील संघर्ष जागतिकी करणाचा रेटा, बदलते संदर्भ मुल्य, बदलते सामाजिक मुल्य, नवनविन तंत्रज्ञान, यंत्रे माहिती याचा परिणाम, तसेच संगणक, टी.व्ही. कॅसेटस् फेसबुक इंटरनेट, मोबाईल टॅबलेट अशा कितीतरी गोष्टीचा परिणाम समाज जीवनावर पडल्यामुळे आज जवळ जवळ साहित्यातून विनोद हद्दपार झाल्याचे जाणवते. परंतु काही टी.व्ही. मालिका चित्रपट, नाटक या माध्यमातून अजूनही तो तग धरून आहे. लोकांना तो आवडतो हे फार महत्वाचे आहे. विनोदाचे आजचे स्वरूप पूर्ण बदलले आहे. आज वेगवेगळ्या माध्यमाद्वारे विनोद प्रसारीत होताना दिसतो. किंवा काही कॅसेटसचा वापर करून पुन्हा पुन्हा तेच तेच कार्यक्रम ऐकले व पाहिले जातात. आजच्या समाज्यामध्ये विनोदी साहित्याची एक पोकळी निर्माण झाल्याचे आपणाला जाणवते. अशा विनोदासाठी पुन्हा लोककला, लोकरूढीचा वापर करून काही कार्यक्रम होताना दिसतात. तर काही कार्यक्रमामध्ये सद्यस्थितीवर आधारीत उपहास विडंबनपर आणि शाब्दीक कोट्या करून संहिता लिहिल्या जातात व सादर केल्या जाताना दिसतात. परंतु म्हणावी तशी आजच्या मराठी साहित्यात विनोदाची निर्मिती होताना दिसून येत नाही. ही मोठी खंत असे मला वाटते.

### *संदर्भसूची :-*

१)जोग रा.श्री., चर्वणा, पुणे-१९६७, पृ. २८.
२)जोग रा.श्री., चर्वणा, पुणे-१९६७, पृ. ४५.
३)कोलते वि.भि., श्री गोविंदप्रभू चरित्र-प्रस्तावना, सु.आ. आठवी, पृ. ३२.
४)लिळापूर्वार्ध भाग-१, लिळा क्र. १९६, पृ. ९७.
५)खांडेकर वि.स., गडकरी व्यक्ती आणि वाङ्मय पुणे, पृ. २६०.
६)देशपांडे पु.ल. ते हसे त्या टाळ्या, आचार्य अत्रे, विविध दर्शन मुंबई, पृ. ११०.
७)पुंडलिक विद्याधर संवाद एका राजा माणसाशी गौरवअंक, पृ. १५.

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,
We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Books Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- Directory Of Research Journal Indexing
- International Scientific Journal Consortium Scientific
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- DOAJ
- EBSCO
- Crossref DOI
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database

Review Of Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.ror.isrj.net